0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुर्ला पोलिस स्टेशन, मुंबई यांचे दि.१४/०६/२०११ रोजीचा अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४१/२०११/जा.४९८, दि.२३/०६/२०११ व ०४/०७/२०११.

३) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुर्ला पोलिस स्टेशन, मुंबई यांचे दि.०१/०७/२०११ रोजीचे अभिवेदन.

४) अबुल बयान अबुल हसनात खान याचे दिनांक ०१/०७/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

५) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुर्ला पोलिस स्टेशन, मुंबई यांचे दि.१३/०७/२०११ रोजीचे अभिवेदन.

६) हरुन शेख याचे दिनांक १३/०७/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

७) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुर्ला पोलिस स्टेशन, मुंबई यांचे दि.३१/०१/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदना सोबतची रासायनिक पृथ:करण अहवालाची छायांकित प्रत.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४१/२०११/जा. ८८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : १८/०२/२०१२.

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

## प्रकरणाची पार्श्वभूमी :-

नसिबुल्ला कंम्पाउन्ड, कुर्ला (पश्चिम), मुंबई ४०० ०७० या ठिकाणी काही लोक तेलामध्ये भेसळ करीत आहेत, अशी माहिती दिनांक २९/०५/२०११ रोजी गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांचे पथकास मिळाल्यानुसार गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई येथील अधिकाऱ्यांनी नसिबुल्ला कंम्पाउन्ड येथील गोडावून क्रमांक ९९ व १०० या ठिकाणी संयुक्त कारवाई करण्याबाबत कुर्ला पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांना सांगितल्याने, दोन्ही पथक सदर ठिकाणी गोडावून क्रमांक ९९ व १०० येथे आले व त्यांनी सदरच्या गोडावूनमधील काळ्या तेलाचे तसेच केरोसिन सारखा वास येणाऱ्या ड्रमची पहाणी करुन मोजणी केली. त्या दोन्ही गोडावूनचे मालका विरुध्द कारवाई करणेकामी

शिधावाटप नियंत्रण अधिकारी उपलब्ध नसल्याने अधिकाऱ्यांनी गोडावूनला सिल लावण्याचे ठरविले व त्या प्रमाणे त्या दोन्ही गोडावूनला सिल लावून तेथे पोलिसांचा पहारा ठेवण्यात आला.

दिनांक २९/०५/२०११ रोजी रविवार असल्याने व शिधावाटप अधिकारी उपलब्ध होत नसल्याने पथकातील अधिकाऱ्यांनी दोन पंचास बोलावून त्यांच्यासमक्ष गोडावून क्र. ९९ चे सिल तोडले व पंचासमक्ष सदरच्या गोडावूनमध्ये प्रवेश केला. सदर गोडावून क्र. ९९ चा मालक नामे अबुल बयान अबुल हसनात खान हा मिळून आल्याने त्याला ताब्यात घेण्यात आले. तसेच सदर गोडावूनमध्ये खालील वर्णनाचा मुद्देमाल मिळून आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | २०० लिटर क्षमतेचे २६ लोखंडी ड्रम्समध्ये काळसर रंगाचे ऑईल सारखा भेसळयुक्त द्रवपदार्थ | अंदाजे ५२०० लि. | ३,१२,०००/- |
| २ | २०० लिटर क्षमतेचे ०९ लोखंडी अर्धवट भरलेले ड्रम्समध्ये काळसर रंगाचे ऑईल सारखा द्रवपदार्थ | अंदाजे ९०० लि. | ५४,०००/- |
| ३ | २०० लिटर क्षमतेचे रिकामे ८६ ड्रम्स | ८६ नग | ३४,४००/- |
| ४ | ५० X १४ फुट लांबी, रुंदीचे गोडावून | १ नग | ४,००,०००/- |
| | | एकूण | ८,००,४००/- |

त्यानंतर अधिकारी पथक गोडावून क्रमांक १०० या ठिकाणी गेले असता, सदर गोडावूनला सिल असल्याने सदरचे सिल तोडून दोन पंचासह गोडावूनमध्ये प्रवेश केला असता, सदर गोडावूनमध्ये खालील वर्णनाचा मुद्देमाल मिळून आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | २०० लिटर क्षमतेचे ३५ लोखंडी ड्रम्समध्ये काळसर रंगाचे ऑईल सारखा भेसळयुक्त द्रवपदार्थ | अंदाजे ७००० लि. | ४,२०,०००/- |
| २ | २०० लिटर क्षमतेचे रिकामे ४५ ड्रम्स | ४५ नग | १८,०००/- |
| ३ | ८ X ३ X ३ फुट लांबी, रुंदी व उंचीचा लोखंडी हौद त्यामध्ये काळसर रंगाचे ऑईल सारखा द्रवपदार्थ | १० लि. | १,०००/- |
| ४ | ४५ X १० फुट लांबी, रुंदीचे गोडावून | १ नग | ३,५०,०००/- |
| | | एकूण | ७,८९,०००/- |

वर नमूद दोन्ही गोडावूनमध्ये मिळालेले तेलाने भरलेले ड्रम्स, रिकामे ड्रम्स, हौद व दोन्ही गोडावूनची किंमत अशी एकूण अंदाजे किंमत रुपये १५,८९,४००/- असून सदरचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

गोडावून क्र. ९९ चा मालक अबुल बयान अबुल हसनात खान यास गोडावून क्र. १०० च्या मालकाबाबत विचारणा केली असता, त्याचे नाव हरुन शेख असल्याचे समजले. तसेच त्याला भेसळयुक्त तेल तयार करणेकामी केरोसिनचा पुरवठा कोण करतो असे विचारले असता, त्याने लाखन असे नाव सांगून त्याचे पूर्ण नाव माहित नसल्याचे सांगितले.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी गोडावूनमध्ये विनापरवाना व अवैधरित्या पेट्रोलजन्य व लुब ऑईलचा साठा करुन ठेवून सदर पेट्रोलजन्य पदार्थामध्ये कोणते तरी रासायनिक द्रव्य भेसळ करुन सदरचे ऑईल हे उच्चप्रतीचे आहे असे भासवून सदर साठा गिऱ्हाईकांना विकण्यासाठी गोडावूनमध्ये ठेवल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) भा. दं. वि. चे कलम ४२०, ३४ (२) दि ल्युब्रिकेटींग ऑईल ॲण्ड ग्रिसेस प्रोसेसिंग सप्लाय ॲण्ड रेडिस्ट्रीब्युशन ऑर्डर - १९८७ चे कलम ३, ४ (३) दि महाराष्ट्र सॉल्वंट रेफिनेट व स्लोप (ॲक्विझीशन, सेल, स्टोरेज ॲन्ड प्रिव्हेन्शन ऑफ युज इन ऑटोमोबाईल) चे कलम ३, ४ (४) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ (२), ८ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द कुर्ला पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १२५/२०११, दि.२९/०५/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन उपरोक्त मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच उपरोक्त सर्व जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुर्ला पोलिस स्टेशन, मुंबई यांनी वाचावे क्र.१ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. ०१/०७/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०१/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस कुर्ला पोलिस ठाणेचे तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. विजय जगन्नाथ बिचकर हे उपस्थित राहिले व त्यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस अबुल बयान अबुल हसनात खान हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ४ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तसेच या शिवाय त्यांना काहीही सांगावयाचे नाही असे सांगितले. तथापी, सदर सुनावणीस इतर आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची एक संधी म्हणून पुढील सुनावणी दि.१३/०७/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १३/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस कुर्ला पोलिस ठाणेचे पोलिस नाईक (बक्कल नं. ००८३७) श्री. अजित विनायक गुंजाळ हे उपस्थित राहिले व त्यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे वाचावे क्र. ५ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस हरुन शेख हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ६ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तथापी, पाहिजे आरोपी लाखन हा अद्यापही मिळून आला नसल्याने नोटीसची बजावणी करता आली नसल्याचे पोलिसांचे अभिवेदनात नमूद आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेला द्रवपदार्थ काळसर रंगाचे ऑईल सारखा असल्याचे पंचनाम्यात नमूद केले आहे. त्यामुळे सदरचा द्रवपदार्थ कोणत्या प्रकारचा आहे ? तसेच त्यात भेसळ होती किंवा कसे ? याकरीता रासायनिक पृथःकरण अहवालाची अत्यंत आवश्यकता असल्याने सदरचा पृथःकरण अहवाल प्राप्त होईपर्यंत प्रकरण अंतिम निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

तदनंतर जप्त केलेल्या द्रवपदार्थाच्या नमुन्यांचा रासायनिक पृथःकरण अहवाल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुर्ला पोलिस स्टेशन यांनी त्यांचे वाचावे क्र.७ अन्वये या कार्यालयास टपालामार्फत सादर केला आहे.

सबब, प्रकरण निर्णयास्तव राखीव ठेवण्यात येत आहे.

**युक्तिवाद :-**

दिनांक ०१/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित कुर्ला पोलिस ठाणेचे तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. विजय जगन्नाथ बिचकर यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुर्ला पोलिस स्टेशन, मुंबई यांचे सादर केलेल्या अभिवेदनात, प्रस्तूत गुन्ह्यात जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंबंधी रासायनिक पृथःकरण अहवाल अद्यापही त्यांच्या पोलिस ठाणेस प्राप्त झालेला नाही. सदर प्रकरणी न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना अहवाल मिळणेकरिता स्मरणपत्र देण्यात आले आहे. सबब, गाळा क्र. ९९ व १०० चे मालक/चालक यांनी गाळा खुला करण्यासाठी निवेदन सादर केल्यास ते विचारात न घेता सदर प्रकरणातील रासायनिक पृथःकरण अहवाल प्राप्त होईपर्यंत तसेच सदर गुन्ह्यातील पाहिजे आरोपी लाखन यास अटक करणे बाकी आहे. तसेच गुन्ह्याचा तपास अद्याप सुरु असल्याने गोडावून मालक यांनी केलेली विनंती मान्य करण्यास कुर्ला पोलिस ठाणेची सक्त हरकत आहे, असे नमूद केले आहे.

RATIONING & C... HEAD OF... M.L.M.E.

दिनांक ०१/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस गोडावून क्र. ९९ चे मालक म्हणून उपस्थित अबुल बयान अबुल हसनात खान यांनी युक्तीवाद केला की, ते ओ.बी. ल्युब्रिकंटस्‌चे मालक असून त्यांच्या नमूद कंपनीच्या नावे उद्योग सहसंचालक यांनी निर्गमित केलेला परवाना असून ते अधिकृतरित्या विविध कंपन्यांकडून डर्टी ऑईल खरेदी करुन बाजारात फेरविक्री करीत आहेत. सदर व्यवहाराची त्यांच्याकडे नियमितपणे नोंद केली जात आहे. तसेच त्यांची कंपनी नियमितपणे प्राप्तीकर भरीत असून तशी विवरणपत्राची प्रत जोडण्यात आली आहे. पोलिसांनी धाड टाकून नसिबुल्ला कंपाऊंड, कालिना रोड, कुर्ला (पश्चिम), मुंबई - ७० येथील गोदामात जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ व ८ अन्वये डर्टी ऑईलचा साठा जप्त केला आहे. सदर गोदामातून पोलिसांनी ८६ रिकामे ड्रम व ६१०० लिटर डर्टी ऑईलचा साठा जप्त केला आहे. त्यांनी सदर प्रकरणी कोणताही गुन्हा केलेला नसून त्यांचेकडे उद्योग सहसंचालक यांचेकडील दि.२७/०१/२०१६ पर्यंत वैध असलेला परवाना, व्हॅटचे नोंदणीकृत प्रमाणपत्र, दि सेंट्रल सेल टॅक्स रुल, १९५७ अन्वये नोंदणीकृत प्रमाणपत्र तसेच प्राप्तीकराचे विवरणपत्र आहे. नमूद गोदामातील जप्त करण्यात आलेला ल्युब्रिकंटचा साठा हा बेस ऑईल असल्याने सदर साठ्यास सॉल्वंट ऑर्डर, २००७ हा लागू नाही. ते सदर साठ्याचे कायदेशिर व्यवसायीक असून साठा जप्त करुन त्यांचे गोदाम सिल केल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे सांगून सदरचा जप्त करण्यात आलेला संपूर्ण डर्टी ऑईलचा साठा त्यांना योग्य त्या अटी व शर्तीवर परत करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १३/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित कुर्ला पोलिस ठाणेचे पोलिस नाईक (बक्कल नं. ००८३७) श्री. अजित विनायक गुंजाळ यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुर्ला पोलिस स्टेशन यांचे सादर केलेल्या अभिवेदनात, सदर गुन्ह्यातील केरोसिनचा पुरवठा करणारा पाहिजे आरोपी लाखन याचे गोडावून नसल्याने व त्याचा राहण्याचा ठावठिकाणा माहित नसल्याने तसेच तो अद्याप पर्यंत मिळून आला नसल्याने त्याचेवर नोटीसची बजावणी करता आली नाही. त्यामुळे सदरची नोटीस पुढील कार्यवाहीसाठी परत आपल्या कार्यालयात सादर करण्यात येत आहे. सदरची छापेमारी ही शासनाचे आदेशान्वये करण्यात आली असून जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाचा नमुना रासायनिक परिक्षणाकरिता न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कलीना, मुंबई यांचेकडे स्मरणपत्रान्वये पाठविण्यात आले असून त्यासंबंधीचा अहवाल अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही. तरी नमुद गुन्ह्यात जप्त केलेल्या मुद्देमालाच्या विल्हेवाटी संदर्भात योग्य मार्गदर्शन आणि स्पष्ट आदेश होणस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

दिनांक ०१/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस गोडावून क्र. १०० चे मालक म्हणून उपस्थित हरुन शेख यांनी युक्तीवाद केला की, ते अे.बी. ल्युब्रिकंटस्चे मालक असून त्यांच्या नमूद कंपनीच्या नावे उद्योग सहसंचालक यांनी निर्गमित केलेला परवाना असून ते अधिकृतरित्या विविध कंपन्यांकडून डर्टी ऑईल खरेदी करुन बाजारात फेरविक्री करीत आहेत. सदर व्यवहाराची त्यांच्याकडे नियमितपणे नोंद केली जात आहे. तसेच त्यांची कंपनी नियमितपणे प्राप्तीकर भरीत असून तशी विवरणपत्राची प्रत जोडण्यात आली आहे. पोलिसांनी धाड टाकून नसिबुल्ला कंपाऊंड, कालिना रोड, कुर्ला (पश्चिम), मुंबई - ७० येथील गोदामात जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ व ८ अन्वये डर्टी ऑईलचा साठा जप्त केला आहे. सदर गोदामातून पोलिसांनी ४००० लिटर वेस्ट ऑईलचा साठा जप्त केला आहे. त्यांनी सदर प्रकरणी कोणताही गुन्हा केलेला नसून त्याचेकडे उद्योग सहसंचालक यांचेकडील अनुज्ञप्ती, व्हॅटचे नोंदणीकृत प्रमाणपत्र, दि सेंट्रल सेल टॅक्स रुल, १९५७ अन्वये नोंदणीकृत प्रमाणपत्र तसेच प्राप्तीकराचे विवरणपत्र आहे. नमूद गोदामातील जप्त करण्यात आलेला ल्युब्रिकंटचा साठा हा बेस ऑईल असल्याने सदर साठ्यास सॉल्वंट ऑर्डर, २००७ हा लागू नाही. ते सदर साठ्याचे कायदेशिर व्यवसायीक असून साठा जप्त करुन त्यांचे गोदाम सिल केल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे सांगून सदरचा जप्त करण्यात आलेला संपूर्ण वेस्ट ऑईलचा साठा त्यांना योग्य त्या अटी व शर्तीवर परत करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचे निवेदन, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, नसिबुल्ला कंम्पाउन्ड, कुर्ला (पश्चिम), मुंबई ४०० ०७० या ठिकाणी काही लोक तेलामध्ये भेसळ करीत आहेत, अशी माहिती दिनांक २९/०५/२०११ रोजी गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांचे पथकास मिळाल्यानुसार गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई येथील अधिकाऱ्यांनी नसिबुल्ला कंम्पाउन्ड येथील गोडावून क्रमांक ९९ व १०० या ठिकाणी संयुक्त कारवाई करण्याबाबत कुर्ला पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांना सांगितल्याने, दोन्ही पथक सदर ठिकाणी गोडावून क्रमांक ९९ व १०० येथे आले व त्यांनी सदरच्या गोडावूनमधील काळ्या तेलाचे तसेच केरोसिन सारखा वास येणाऱ्या ड्रमची पहाणी करुन मोजणी केली. त्या दोन्ही गोडावूनचे मालका विरुध्द कारवाई करणेकामी शिधावाटप नियंत्रण अधिकारी उपलब्ध नसल्याने अधिकाऱ्यांनी गोडावूनला सिल लावण्याचे ठरविले व

CONTROLLER OF RATIONING ... M

त्या प्रमाणे त्या दोन्ही गोडावूनला सिल लावून तेथे पोलिसांचा पहारा ठेवण्यात आला. दिनांक २९/०५/२०११ रोजी रविवार असल्याने व शिधावाटप अधिकारी उपलब्ध होत नसल्याने पथकातील अधिकाऱ्यांनी दोन पंचास बोलावून त्यांच्यासमक्ष गोडावून क्र. ९९ चे सिल तोडले व पंचासमक्ष सदरच्या गोडावूनमध्ये प्रवेश केला. सदर गोडावून क्र. ९९ चा मालक नामे अबुल बयान अबुल हसनात खान हा मिळून आल्याने त्याला ताब्यात घेण्यात आले. तसेच दोन्ही गोडावूनमध्ये मिळालेले तेलाने भरलेले ड्रम्स, रिकामे ड्रम्स, हौद व दोन्ही गोडावूनची किंमत अशी एकूण अंदाजे किंमत रुपये १५,८९,४००/- असून सदरचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

प्रस्तुत गुन्ह्यात जप्त केलेल्या द्रवपदार्थाचे नमुने पोलीसांनी रासायनिक पृथ:करणासाठी न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेत पाठविले असता, सदर नमुन्यांचा पृथ:करण अहवाल Exhibit Nos. 1 to 12 contains petroleum hydrocarbon oil असा प्राप्त झालेला आहे.

सदर गुन्ह्यातील गोडावून क्र. ९९ मधील जप्त साठ्याचे मालक अबुल बयान अबुल हसनात खान यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, ते अे.बी. ल्युब्रिकंटस्‌चे मालक असून त्यांच्या नमूद कंपनीच्या नावे उद्योग सहसंचालक यांनी निर्गमित केलेला परवाना असून ते अधिकृतरित्या विविध कंपन्यांकडून डर्टी ऑईल खरेदी करुन बाजारात फेरविक्री करीत असल्याचे तसेच त्याच्याकडे असलेल्या लायसन्सनुसार तो ट्रेडिंगचा व्यवसाय करीत असल्याचे सांगून त्यांनी "दि ल्युब्रीकेटींग ऑईल्स ॲण्ड ग्रीसेस (प्रोसेसिंग, सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७" मधील तरतुदीनुसार त्यांना ल्युब्रीकेटींग ऑईलचा व्यवसायाकरीता देण्यात आलेला परवाना क्र. एम.एम.आर./ल्युब ऑईल ग्रिस ऑर्डर/००७६/२००१ दि.३०/०१/२००१ रोजी त्यांनी संबंधित प्राधिकरणाकडून प्राप्त केले असल्याचे तसेच सदरचा परवाना उद्योग सहसंचालक यांचे दिनांक १७/०१/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिनांक २७/०१/२०१६ पर्यंत वैध असल्याचे सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

त्याचप्रमाणे सदर गोडावून क्र. ९९ मधील जप्त साठ्याचे मालक यांनी सुनावणीचेवेळी, पेट्रोलियम द्रवपदार्थाच्या साठवणुकीकरीता आवश्यक असलेला बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील साठवणूकीकरिताचा परवाना सादर केलेले नसून सदर परवानाधारकावर नियमानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याकरीता उद्योग सहसंचालक (एमएमआर) या परवाना प्राधिकरणास स्वतंत्र कळविण्यात येत आहे.

सबब, सद्य:परिस्थितीत माझे समोर असलेली उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, गोडावून क्र. ९९ मधील जप्त केलेला संपुर्ण द्रवपदार्थाचा साठा तसेच रिकामे ड्रम हे त्यांच्या सध्याच्या बाजारमुल्याएवढया किंमतीच्या क्षतीपुर्ती बंधपत्रावर त्यांच्या मालकांस परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

गोडावून क्र. १०० मधील जप्त साठ्याचे मालक हरुन शेख यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, ते अे.बी. ल्युब्रिकंटस्चे मालक असून त्यांच्या नमूद कंपनीच्या नावे उद्योग सहसंचालक यांनी निर्गमित केलेला परवाना असून ते अधिकृतरित्या विविध कंपन्यांकडून डर्टी ऑईल खरेदी करुन बाजारात फेरविक्री करीत असल्याचे तसेच त्याच्याकडे असलेल्या लायसन्सनुसार तो ट्रेडिंगचा व्यवसाय करीत असल्याचे सांगून त्यांनी दि ल्युब्रीकेटींग ऑईल्स ॲण्ड ग्रीसेस (प्रोसेसिंग, सप्लाय, ॲण्ड डिस्ट्रीब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७ मधील तरतुदीनुसार व्यवसायाकरीता आवश्यक असलेला उद्योग सहसंचालक यांचेकडील मे. हरुन एन्टरप्रायझेस या नावे असलेला परवाना क्र. एम.एम.आर./ल्युब ऑईल ग्रिस ऑर्डर/००५२/२००४ दिनांक २२/१२/२००४ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या परवान्याची छायांकित प्रत सादर केली आहे. तथापी, सदर परवान्यावरील वैधता दिनांक २१/१२/२००९ रोजी समाप्त झाली असल्याचे दिसून येते. सदर गोडावून मालकाने परवाना नुतनीकरणाकरीता संबंधित प्राधिकारणाकडे अर्ज केला आहे किंवा कसे, याबाबत कोणताही खुलासा सुनावणीचेवेळी केलेला नाही अथवा त्यासंदर्भात पुरावादर्शक कागदपत्रेही सादर केलेली नाहीत. तसेच ते अे.बी. ल्युब्रिकंटस्चे मालक असल्याचे खुलाशात जरी नमूद केले असले तरी त्यांनी मे. हरुन एन्टरप्रायझेस या नावाचे पुरावादर्शक कागदपत्रे सादर केली आहेत. अशाप्रकारे त्यांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे व दिशाभूल करणारे आहे. यावरुन गोडावून क्र. १०० मधील जप्त साठ्याचे मालक हरुन शेख यांनी त्यांच्याकडे असलेल्या अवैध परवान्यावर बेकायदेशीररित्या व अनधिकृतपणे पेट्रोलियम द्रवपदार्थाची साठवणूक करुन व्यवसाय केला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सबब, गोडावून क्र. १०० मधील जप्त केलेला संपुर्ण द्रवपदार्थाचा साठा, रिकामे ड्रम व लोखंडी हौद शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

तसेच सदर गोडावून क्र. १०० मधील जप्त साठ्याचे मालक यांनी त्यांच्याकडे असलेल्या अवैध परवान्यावर पेट्रोलियम द्रवपदार्थाची साठवणूक व व्यवसाय केला असल्याने तसेच पेट्रोलियम द्रवपदार्थाच्या साठवणुकीकरीता आवश्यक असलेला बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील साठवणूकीकरिताचा परवाना सादर केलेले नसून सबंधित परवानाधारकावर नियमानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याकरीता उद्योग सहसंचालक (एमएमआर) या परवाना प्राधिकरणास स्वतंत्र कळविण्यात येत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, गोडावून क्र. १०० मधील जप्त मुद्देमालाचा साठा शासनजमा करण्यात येत असून सदर गोडावूनमधील जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाच्या तपशिलामध्ये गोडावूनची किंमत दर्शविण्यात आलेली असून

HEAD OFFICE MUMBAI

नमूद गोडावून हे स्थावर मालमत्ता असल्याने याबाबत मा. न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये कुर्ला पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १२५/२०११, दि.२९/०५/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :**

१) प्रस्तूत प्रकरणी गोडावून क्र. ९९ मधील जप्त केलेला २०० लिटर क्षमतेचे २६ लोखंडी ड्रम्समध्ये काळसर रंगाचे ऑईल सारखा भेसळयुक्त द्रवपदार्थ अंदाजे ५२०० लिटर, २०० लिटर क्षमतेचे ०९ लोखंडी अर्धवट भरलेले ड्रम्समध्ये काळसर रंगाचे ऑईल सारखा द्रवपदार्थ अंदाजे ९०० लिटर, २०० लिटर क्षमतेचे रिकामे ८६ ड्रम्स असा संपुर्ण साठा हा त्यांच्या प्रत्येकी सध्याच्या बाजारमुल्याएवढया किंमतीचे क्षतीपुर्ती बंधपत्र पोलिसांनी घेऊन त्याच्या मालकास परत करण्यात यावा.

२) गोडावून क्र. १०० मधील जप्त करण्यात आलेला संपुर्ण २०० लिटर क्षमतेचे ३५ लोखंडी ड्रम्समध्ये काळसर रंगाचे ऑईल सारखा भेसळयुक्त द्रवपदार्थ ७०० लिटर, लोखंडी हौदामध्ये काळसर रंगाचे ऑईल सारखा द्रवपदार्थ १० लिटर साठा शासनजमा करण्यात यावा. सदरच्या साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) गोडावून क्र. १०० मधील जप्त करण्यात आलेले संपूर्ण एकूण २०० लिटर क्षमतेचे रिकामे ३५ लोखंडी, २०० लिटर क्षमतेचे रिकामे ४५ ड्रम्स, ८ X ३ X ३ फुट लांबी, रुंदी व उंचीचा लोखंडी हौद इ. वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

४) गोडावून क्र. १०० बाबत मा. न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food,

0010
Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE

प्रति,

१) गोडावून क्र. ९९ चा मालक, अबुल बयान अबुल हसनात खान
२) गोडावून क्र. १०० चा मालक, हरुन शेख
३) लाखन
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुर्ला पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, कुर्ला पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
३) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.